पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/स्वयंअशाळा/ ३२६/१७
पुणे १ दिनांक :- /१/२०१७
८/३/१७

प्रति,

**अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,**
**कै. उध्दवराव तुळशीराम जाधवर फौंडेशन वडगांव बु, पुणे संचलित डॉ सुधाकरराव जाधवर प्राथमिक ते उच्च माध्यमिक विद्यालय, धनकवडी, पुणे**

**विषयः-** सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

**संदर्भः-** १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४ ) २०१२
२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१, दि. २० जुन २०१२
३. शासन निर्णय एसएफएस-२०१६/प्र.क्र.९९/एसएम-२, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ दि.९.८.२०१६
४ मा.शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडील आदेश क्र. शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१६/ दि. ३० सप्टेंबर २०१६

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर **नवीन शाळा स्थापना** व दर्जावाढ करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. १ च्या पत्रानुसार **नविन शाळा स्थापन** व दर्जावाढ करणेकरिता **खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

| अ. क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ९ |
| १ | **कै. उध्दवराव तुळशीराम जाधवर फौंडेशन, वडगांव बु, पुणे** | **डॉ सुधारकरराव जाधवर प्राथमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, धनकवडी, पुणे** | इंग्रजी | नवीन शाळा (राज्यमंडळ) | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (सर्व शाखा) इ. १ ली | स्वयंअर्थ सहाय्यित सन २०१६-१७ |

## अटी व शर्ती

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदीनूसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
४. संदर्भ क्रमांक ०२ अन्वये सन २०१६-१७ मध्ये परवानगी देण्यात येत आहे.
५. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवतराव चव्हाण भवा
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्रशा/५८६/२०१८
पुणे १ दिांकः- २७/०९/२०१८

प्रति,

**मुख्याध्यापक**
**प्राचार्य डॉ.सुधाकरराव जाधवर**
**इंग्लिश मेडियम स्कुल ॲन्ड ज्यु.कॉलेज**
**धनकवडी पुणे**

विषयः-नैसर्गिक वाढीने इ. २री ते ८ वी च्या वर्गास मान्यता मिळणेबाबत..

संदर्भः-आपले कार्यालयाकडील पत्र क्र ११-१५-२२४

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविणेत येते की, प्राचार्य डॉ.सुधाकरराव जाधवर इंग्लिश मेडियम स्कुल ॲन्ड ज्यु.कॉलेज धनकवडी पुणे प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाला असुन इयत्ता १ ते १२ वी प्राथमिक ते उच्च माध्यमिक या कार्यालयाचे पत्र क्र.३२६/१७ दिनांक ०८/०३/२०१७ अन्वये मान्यता असल्याने इयत्ता २ री ते ८ वी च्या वर्गाला नैसर्गिक वाढ देणेची आवश्यकता नाही.

शिक्षणाधिकारी प्राथमिक
पुणे जिल्हा परिषद पुणे

**सोबतः-मुळ नस्ती**

# पुणे जिल्हा परिषद, पुणे.
## यशवंतराव चव्हाण भवन, वेलस्ली रोड, कॅम्प, पुणे - ४११ ००१.
## शिक्षण विभाग (प्राथमिक)
Email- edupri.zppune@gmail.com | ssapune1@yahoo.co.in


## प्रथम मान्यता

जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा1/339/ 2348 /2024 पुणे 1 दिनांक: 08/04/2024

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,
निनाईदेवी शिक्षण संस्था, मंगलमुर्ती कम्प्लेक्स, धनकवडी, शेवटचा बस स्टॉप, पुणे 43 संचालित
चाटे पब्लिक स्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज, ( 27251601027 ) धनकवडी, पुणे-43

विषय - सन 2022-23 या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भ - 1.शा.नि.क्रमांक एसएफएस-1016/प्र.क्र.99/ एसएम-2, दिनांक 09 ऑगस्ट 2016 शालेय शिक्षण मंत्रालय, मुंबई
2.जा.क्र.शिउस/प्राथ 2/ स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/2016/16911, शिक्षण उपसंचालक पुणे विभाग दि 27/07/2016
3. शाळेकडील प्रथम मान्यता प्रस्ताव 28/02/2024
4.श्री.शब्बीर लालू शेख, विस्तार अधिकारी (शिक्षण),जि.प.पुणे यांचेकडील तपासणी अहवाल दिनांक 27/03/2024

उपरोक्त संदर्भीय विषयांन्वये कळवण्यात येते की, आपल्या संस्थेने प्रथम मान्यता करीता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार व तपासणी अधिकारी यांनी केलेली शिफारशी नुसारआपल्या संस्थेस संदर्भ क्र .1 ते 4 नुसार खालील अटी व शर्तीवर इयत्ता 2 री ते इयत्ता 8 वी साठी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | सुरु वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | निनाईदेवी शिक्षण संस्था, मंगलमुर्ती कम्प्लेक्स, धनकवडी, शेवटचा बस स्टॉप, पुणे 43 | चाटे पब्लिक स्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज, ( 27251601027 ) धनकवडी, पुणे-43 | इंग्रजी | नवीन शाळा स्वयंअर्थसहाय्यित | इयत्ता 2 री ते इयत्ता 8 वी | 2016-17 |

### अटी व शर्ती

1. मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण इ.मध्ये भविष्यात शासनच्या परवानगीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.
2. शाळा व्यवस्थापनाने शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर त्या शाळेची परवानगी रद्द होईल.
3. स्वयंअर्थ सहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमानुसार व विनियमानुसार करण्यात यावी.
4. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
5. परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थ सहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहिल.
6. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं अर्थ सहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा , मंडळ सलग्नता क्रमांक, UDISE कोड इ. तपशील दर्शविणारा फलक लावणे बंधन कारक राहील.
7. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
8. शासन मान्यता पत्र क्र. एसएफएस-1016/प्र.क्र.99/ एसएम-2, दिनांक 09 ऑगस्ट 2016 मधील सर्व अटी व शर्ती पुर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.
9. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 याअधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.
11. **भविष्यात या शाळेची प्रथम मान्यता बाबत कोणत्याही स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यास अथवा न्याय प्रविष्ठ प्रकरण उद्धवल्यास सदरचा प्रथम मान्यता आदेश रद्द करण्यांत येईल.**

( संजय नाईकडे )
शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद,पुणे